ISSN 2347-6834

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO GLOBAL RESEARCHERS

(Refereed, Peer Reviewed & Indexing Research Journal)

EDITOR IN CHIEF

Dr. Nilam Chhangani

IMPACT FACTOR 6.20

ISSN 2347-6834

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects

# INDO GLOBAL RESEARCHERS

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XIX, Vol. I

Year- X, Bi-Annual (Half Yearly)

(Nov. 2022 To April 2023)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Website**
www.irasg.com

**Contact : - 02382 - 241913**
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

**E-mail :**
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
**Indo Asian Publication,**
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**EDITOR IN CHIEF**

**Dr. Nilam Chhangani**
Head, Dept. of Economics,
S. K. N. G. Mahavidyalaya,
Karanja Lad, Dist. Washim(M.S.) India

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Sachin Napte**
Dept. of Mahagement
Indira Business School,
Pune, Dist. Pune (M.S.)

**Dr. Balaji G. Kamble**
Professor,Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur (M.S.)

**DEPUTY EDITOR**

**Dr. Dileep S. Arjune**
Head, Dept. of Economics,
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna (M. S.)

**Dr. Allabaksh H. Jamadar**
Chairman, BOS, Hindi,
S.R.T.M.University,
Nanded, Dist. Nanded (M.S.)

**CO - EDITOR**

**Dr. Arun R. Kumbhar**
Head, Dept. of Economics,
Arts & Comm. College,
Nesri, Dist. Kolhapur (M.S.)

**Dr. Eknath J. Helge**
Head, Dept. of Commerce,
Jijamata Mahavidyalaya,
Buldhana, Dist. Buldhana (M. S.)

**MEMBER OF EDITORIAL BOARD**

**Dr. Mohmmad T. Rahaman**
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

**Dr. Sivvappa Rasapali**
Dept. of Chemistry,
UMASS, Dartmouth,
MA (United States)

**Dr.Satyenkumar P. Sitapara**
Principal
Commerce & BBA College,
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

**P. M. Band**
Dept. of Dept. of Chemistry,
College of Eng. & Technology,
Babhulgaon, Dist. Akola (M. S.)

**Dr. Arun Farfat**
Head, Dept. of History,
Shri. S.G. M. College,
Borgaon Manju, Dist. Akola(M.S.)

**Dr. Suresh Dhake**
Head, Dept. of Economics,
S.N.D.T. College,
Dongar katore, Dist. Jalgaon (M.S.)

**Dr. Dilip R. Jagtap**
Dept. of Economics,
G. T. Patil College,
Nandurbar, Dist. Nandurbar(M.S.)

**Dr. Nana Wankhede**
Dept. of History,
Shivaji College,
Akola, Dist. Akola ( M.S. )

**Dr. O. V. Shahapurkar**
Head, Dept. of Geography,
Rajarshi Shahu College,
Latur, Dist. Latur (M.S.)

**Arun U. Patil**
Dept. of Economics,
Arts & Comm. College,
Akkalkuwa, Dist. Nandurbar (M.S.)

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Antibacterial and Antioxidant Activity of Ocimum Basilicum L. leaf **Dr. S. D. Dhavle** | 1 |
| 2 | Environmental Friendly and Chief Synthesis of tetra-substituted Imidazole's Catalyzed by Zeolite HY and Silica Gel under Microwave irradiation **Dr. Swanand S. Mukhedkar** | 6 |
| 3 | Synthesis, Spectroscopic Characterization and Antibacterial Activities of Schiff Base and Their Metal Complexes Derived from Dehydroactic Acid **Dr. Mahesh S. Bachewar** | 13 |
| 4 | Review of Efficancy of Some Antiseptics and Disinfectants **Dr. Jayshri V. Bhise** | 19 |
| 5 | Consequence of Vermicomposting on Nutrient Reclamation from Vegetable Organic Waste **Dr. M. S. Pentewar** | 29 |
| 6 | भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते परिदृश्य : १९४७-२०२० **डॉ. निलम छंगाणी** | 36 |
| 7 | महाराष्ट्रातील आधारभूत संरचनेतील बदलांचे अध्ययन **डॉ. मधुकर श्रीराम ताकतोडे** | 41 |
| 8 | व्यापारात ई-कॉमर्सची भूमिका आणि प्रभाव **डॉ. अर्चना डी. भैसारे** | 46 |
| 9 | आधुनिक जहांगीरी पध्दत एक ऐतिहासिक अभ्यास **डॉ. विजयकुमार तांबारे** | 51 |
| 10 | जागतिकीकरणात स्त्रीवादाचे स्वरुप व स्त्रियांचे स्थान **प्रतिभा कृष्णराव आवंडकर** | 59 |
| 11 | दलित मराठी वाडमयीन नियतकालीकांचे साहित्यातील योगदान **डॉ. चंद्रकांत शेरखाने** | 65 |

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/

IMPACT FACTOR
6.20
ISSN 2347- 6834
Indo Global Researchers (IGR)
Issue : XIX, Vol. I
Nov. 2022 To April 2023
www.irasg.com

Research Paper 10 Marathi

# जागतिकीकरणात स्त्रीवादाचे स्वरुप व स्त्रियांचे स्थान

**प्रतिभा कृष्णराव आवंडकर**
मराठी विभाग,
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

आज आपण जागतिकरणाचा एक भाग बनत आहोत. आपण २१ व्या शतकात म्हणजे माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वावरत आहोत. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये सर्व जग जवळ आले आहे, असे म्हणतो. हे सर्व खरे असले असले तरी, या सगळया जागतिकीकरणाच्या प्रवासामध्ये स्त्रिया नेमक्या कुठे आहेत. याचा शोध घेणे अपरिहार्य वाटते. स्त्रियांनी स्त्रिवाद निर्माण केला. त्यांच्या स्त्रीवादाच्या मागण्यांनी स्त्रियांच्या ओंजळीत नेमके काय टाकले आहे. स्त्रियां स्वत: किती सक्षम झाल्या आहेत. की जागतिकीकरणात ती एक शोभेची बाहुली म्हणुन वापर केला जात नाही. तिच्या खंबीरपणाचे खच्चीकरण तर केल्या जात नाही याचा शोध या लेखात घेण्याचा प्रयत्न आहे.

**जागतिकीकरण म्हणजे काय :**

१) जागतिकीकरण म्हणजे नवउदारमतवादी, नवसाम्राज्यवादी विचारसरणीने घेतलेला आक्रमक पवित्रा आहे. बाजारपेठेचे हिताच्या अनुसार सुधारणा जागतिक अर्थव्यवस्थेत घडवून आणणे हे जागतिकीकरणाचे वैशिष्ट्य आहे. आणि भांडवजशाही पध्दतीने अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी भांडवलाची हालचाल व ने आण या देशातुन सहज पध्दतीने करता यावी म्हणुन वेगवेगळ्या देशांच्या सरकारांना आर्थिक पुनर्रचना करायला भाग पाडणे ही त्याची कार्यप्रणाली आहे.

२) माध्यमांवर मालकी ज्यांची—त्यांच्याच कल्पना आणि मूल्यव्यवहार त्यातुन चालत राहतो. यालाच सगळे जण 'ग्लोबल इंडस्ट्री' असे म्हणतात.

३) जागतिकीकरण म्हणजे जागतिक होणे, वैश्विक होणे, प्रांत, राष्ट्र, यांच्या सीमारेखा स्पष्ट होवून विश्वात्मक होणे.

४) जागतिकीकरण म्हणजे ही अशी मुक्त चळवळ आहे, की जिच्यात भांडवल उत्पादक, उत्पादन, कल्पना, कला, साहित्य आणि संस्कृती तसेच याबरोबर जिवंत माणसांचा सुध्दा उत्पादक घटक म्हणून समावेश होतो.

५) जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था अस्तित्वात आणण्यासाठी सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे होय.

६) माल्कॉम एस. ऑडिसेहिहाच्या मते जागतिकीकरण म्हणजे उदयोन्मुख अर्थव्यवस्थेला जागतिक परिणाम प्राप्त करुन देणे, म्हणजेच आर्थिक धोरणांच्या बाबतीत सुसंगतता निर्माण करुन देणे.

७) 'जागतिकरण ही अनंत स्पर्धेची व्यवस्था आहे. इंग्रजीत असलेला शब्द अधिक समर्पक वाटतो. 'कट थ्रोट कॉम्पिटिशन' चुरशीची लढत.

८) शंभर कोटींच्या भारतामध्ये जागतिक अर्थव्यवस्थेची ही उघळलेली दौड माणसांचे रोजगार, त्यांचे पोटपाणी, त्यांचे साध्ये, त्यांचे सुखसमाधान यांच्या बाबतीत धुमाकुळ घालीत आहे. ही व्यवस्था सगळ्याच गोष्टींकडे संसाधने, उत्पादन, घटक म्हणुन बघते आहे.

**जागतिकीकरणाचे स्वरुप** :

जागतिकरणाची संकल्पना ही उदात्त, मानवी मुल्यांची व संस्कृतीची संकल्पना आहे. जागतिकीकरण ही विशुध्द रुपातील आर्थिक संज्ञा आहे.

के. एन. पळशीकर (पण्णीकर) म्हणतात की, आर्थिक संदर्भांना डावलून जागतिकीकरणाचा विचार करता येत नाही. या संदर्भात 'कधीतरी ही भांडवलशाही विश्वबाजाराच्या दिशेने वाटचाल करु लागेल' हे मार्क्सचे म्हणणे आज खरे ठरले आहे. कारण आज तशी स्थिती निर्माण झाली आहे नव्हे तसेच झाले आहे.

जागतिकीकरणाच्या बाजारात दोन वर्ग दिसतात एक वर्ग वस्तू विकणाऱ्यांचा आणि दुसरा विकत घेणाऱ्यांचा ही वस्तु एखादे उत्पादन तरी असणार नाही परंतु जिवंत माणुस किंवा त्यांची बुध्दी, संस्कृती आणि कौशल्ये तरी असतील. आणि आहेत.

**जागतिकरणामध्ये वैश्विकता** :

संत ज्ञानेश्वर किंवा संत रामदास यांनी 'हे विश्वची माझे घर' 'आता विश्वात्मके देवे' अशा ओळींमधून वैश्विक मूल्ये दिसतात. संताच्या वैश्विकतेच्या संकल्पनेतील मूल्ये जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत जाणवत नाहीत. त्यामुळे जागतिकीकरण आणि वैश्विकीकरण या दोन संकल्पनांमध्ये फरक जाणवतो.

संताच्या वैश्विकीकरणात माणूस, माणूसपणा, त्याचे माणसाशी आणि निसर्गाशी असलेले नाते आणि या ऋणानुबंधातून होणारा व्यापक, विशाल असा विकास दडलेला आहे.

जागतिकरणात मात्र हे सर्व अनुबंध आर्थिक व्यवस्थेशीच निगडित झालेले दिसतात. ज्याच्याजवळ पैसा तो सत्ता गाजवणार आणि इतर गुलाम. मग तो देश असो नाहीतर माणसे असोत. म्हणून या जागतिकीकरणाच्या वैश्विकतेशी कोणताही जवळचा असा संबंध वाटत नाही. कारण जागतिकीकरण माणसाचे कोणतेही जिव्हाळ्याचे संबंध स्वत:शी जोडून घेत नाही.

वैश्विकता हे एक जीवनाधिपिठत मूल्य भारत जोपासू पाहतो आहे. भारताच्या विकासाला तत्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. केवळ व्यापार असे न पाहता माणसाला माणूस म्हणून जगता येणारी व्यवस्था उभी करणे हे भारताचे आजच्या जागतिकीकरणातले सुध्दा स्वप्न आहे. उदा. अफगानीस्थानला आर्थिक बजेट मध्ये स्थान देणे, तुर्कस्थानमध्ये झालेल्या भूकंपामध्ये त्वरित मदत पोहचविणे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी माणसाचे माणसाशी अत्यंत अंत:करणाचे, संस्कृतिकतेचे संबंध जोडण्यात साहित्य माहीर असते पण जागतिकीकरण ते ही व्यापारी झाले आहे.

जागतिकीकरणात सहभागी झालेल्या विदेशी कंपन्यांचा हेतु केवळ नफा मिळवणे हाच असतो. प्रादेशिक स्तरांवरील माणसांच्या गरजा,

भावना, आर्थिक परिस्थिती यांच्याशी त्यांना काही देणेघेणे नसते. त्यामुळे नफ्याच्या उद्देशामुळे त्या बाजारपेठेची मक्तेदारी मिळविण्याचे प्रयत्न अधिक होतात.कधी कधी तर या अशा व्यवस्थेने प्रसारमाध्यमाचा आधार घेवून माणसांना खरेदीला प्रवश्त्त करुन गुलाम बनविले आहे. यावरुन असेही म्हणता येते की प्रसारमाध्यमेही चंगळवादाला प्रोत्साहनच देत आहेत. या सगळ्या प्रक्रियेतून साहित्य आणि प्रसारमाध्यमे आणि तेथील प्रादेशिक भाषेचा व्यापारही अलिप्त राहू शकलेला नाही. जागतिकरणाने 'विषमता' ही देणगी दिलेली आहे. ती अधिकाधिक निर्माण करण्यातच जागतिकीकरणाला सारस्य आहे. जागतिकीकरणाने लादलेल्या आर्थिक गुलामगिरीतच सर्वांना धन्यता वाटत राहील. एका विचारवंताने म्हटले आहे की, ज्याच्या जवळ त्यांच्या संस्कृतीची मूल्ये आहेत आणि तो त्याच्यापासून जराही ढळणार नसेल तर जागतिकीकरणाची त्याला कधीच झळ पोहोचणार नाही.

**जागतिकीकरण आणि स्त्रीवाद** :

पाश्चाात्य विचारणीमधूनच स्त्रीवाद जन्माला आला. पाश्चात्य देशामध्ये, भांडवली व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे नेमके कोणते स्थान आहे. आणि त्यांना कशी वागणूक दिली जाते. स्त्रियांच्या वाटेला आलेल्या विषमता या विचारातूनच स्त्रीवादाची निर्मिती झाली आहे. स्त्रीच्या मनातला दबलेला 'स्व:' यांची जाणीव स्त्रीयांना झाली त्यामुळे बदलांची दृढ संकल्पना अस्तित्वात आणली आणि स्त्रीवादाची निर्मिती झाली असावी. पाश्चात्य देशांमध्ये संपूर्ण मूल्यव्यवस्थाच भांडवलशाहीच्या अधीन होती. त्यामुळे स्त्रीयांची होणारी फरफट, अवहेलना, अन्याय स्त्रियांच्याच लक्षात आले आणि या समूहभागातून परस्परांचा परस्परांशी समुहसंवाद निर्माण झाला आणि त्यांना आत्मभानाचा मार्गही सापडला. यातूनच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संवर्धनाला सुरुवात झाली. हळुहळू या विचाराला वाचा फोडणारी चळवळ नंतर एक स्वतंत्र विचार प्रवाह बनला. त्यातून स्त्रीवाद जन्माला आला.

'आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय आणि लैंगिक पातळीवर स्त्रियांचे शोषण कसे होते हे उलगडून दाखवून त्याच्या विरुद्ध लढा देणारी स्त्रीवाद ही एक वैचारीक चळवळ निर्माण झाली. हेच स्त्रीवादाचे स्वरुप आहे.

मैरी वुलस्टोनकाप्ट ही स्त्रीवाद, पाश्चात्य राजनितीक विचारक होती. स्त्रीयांच्या अधिकारावर लिहिणारी ब्रीटीश लेखिका होती. १०० वर्षानंतर प्लेटोनंतर स्त्रियांच्या अधिकारांविषयी बोलणरा जॉन मिल हा पहिला पुरुष १८६७ मध्ये त्याने कायदेमंडळात महिलांना मताधिकार देण्यासाठीचे विधेयक मांडले होते पण ते फेटाळले गेले त्यांच्या मते 'दुसऱ्या व्यक्तीचे मत दाबून ठेवण्यात काहीही लाभ नसतो' 'स्वत:पुरता, स्वत:च्या शरीर आणि मन:संदर्भात माणुस सार्वभौम आहे' स्वयंनिष्ठ कृत्यांच्या बाबत माणूस पूर्ण स्वतंत्र आहे. असे जॉन स्टुअर्ट— मिल हॅरिएट टेलर यांची विचारसारणी होती.

**सुफ्रिजेट (Suffragette) चळवळ:**

ही संपूर्ण जगातल्या महिलांना मताधिकार प्राप्त करुन देणारी 'सुफ्रिजेट' चळवळ आहे, युरोप आणि अमेरिकेमध्ये महिलांना मतदान करण्याचा अधिकार नव्हता. हळूहळू या बाबतीत लढा सुरु झाला. या चळवळीला आपण 'सुफ्रिजेट मुमेंट' म्हणून ओळखतो.

पहिल्या जागतिक युद्धाच्या दरम्यान सर्व स्थानिक पुरुष जेव्हा युद्धावर गेली होती तेव्हा

तेथील महिलांवरच संपूर्ण जबाबदारी येऊन पडली होती. जे या अगोदर फक्त पुरुष सांभाळत होते. तमाम महिलांना यांची जाणीव झाली की, आपल्यामध्येही सर्व जबाबदाऱ्या पेलण्याची क्षमता आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे आणि अवसर प्राप्त न झाल्यामुळे महिला पुढे येऊ शकल्या नाही. १९ व्या शतकात सामान्य माणसाला आणि स्त्रियांना त्याची जाणीव होऊ लागली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेमधील स्त्री व इंग्लंड मधील स्त्रियांनी मतदानाच्या हक्कासाठी जवळजवळ दोन दशके जिवाची तमा न बाळगता जीव लावून लढा दिला. कितीतरी अत्याचार, जीवघेण्या यातना सोसल्या. त्यांच्या याच आंदोलनाला सुफ्रिजेट आंदोलन म्हणतात. आंदोलनाचा आवाज जगभर पसरला. वसाहतींपर्यंत पोहचला तसाच तो भारतातही पोहोचला.

सिमॉंद द बोव्हाच्या 'द सेकण्ड सेक्स' या पुस्तकाने पुरुषप्रधान संस्कशती स्त्रीची जडणघडण आपल्या स्वार्थापोटी स्त्रीपणाच्या साच्यात बसवुन कशी करते आहे आणि तेच तिच्या विकासाला कसे घातक आहे. ते या ग्रंथात मांडले. हा स्त्रीवादाचा 'पहिला पाश्चात्य उद्‌गार' म्हणता येईल. यानंतर स्त्रीमुक्ती चळवळीची पावले जलद गतीने पडू लागली आणि मग तिचे आविष्कार विविध रुपाने समाजासमोर येवू लागले. या सर्वांना 'रेडस्टॉकिग्ज, न्युयार्क रॅडिकल फेमिनिस्ट' या संस्थानी हातभार लावला व लिंगभेजन्य विषमतेविरुद्धचा लढाही दिला. या सगळ्यावरचा कळस म्हणजे आपल्याला केट मिलेट यांचा 'सेक्सुअल पॉलिटिक्स' या नावाचा ग्रंथ म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीच्या ठिकाणी जननक्षमता आहे. हेच तिला सांभाळण्याचे आणि दडपून ठेवण्याचे मुख्य कारण होते. हा विचार भारतामध्ये फार उशिरा आला. १९६० नंतर भारतीय साहित्यातून हा विचार कुठेतरी साहित्यातून येऊ लागला. आणि नंतर अभ्यास करु लागलो, अभ्यासातून मांडू लागलो. यापूर्वी भारतात असे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. पण ते सारे सामाजिक आणि संस्कृतीच्या मांडवाखाली घडले.

आज स्त्रीवादाचे स्वरुप, स्त्रीवाद हा जागतिक स्तरावर पोहोचला आहे. स्त्रीवादाची काही उद्‌दीष्टे आहेत. त्यातील अत्यंत महत्त्वाचे म्हणजे स्त्री माणूस समजा पशु नव्हे. तिने आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होणे, तिला निवडीचे स्वातंत्र असणे , जिविताच्या नियंत्रणाचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे, तिला आत्मप्रतिष्ठा व स्वयंसिद्धता मिळवून देणे, तिच्या बद्‌दलच्या विषमतेचे आणि शोषणाचे उच्चटन करणे, राष्ट्रीय विकासात तिचे सहकार्य घेणे, तिच्यासाठी आरक्षण असणे, लैंगिक व अपत्यनिर्मितीसंबंधीचे स्वातंत्र मिळवुन देणे, अशी काही उद्‌दिष्टे डोळ्यासमोर ठेवून ही चळवळ आज कायदाचा सन्मान मिळवत आहे.

जागतिकीकरणाने स्त्रियांच्या आयुष्यात नेमके काय घडले, याचा वेध मराठी साहित्याने घेण्याचा प्रयत्न केला आहे. १९९० नंतरच्या लेखकांनी केलेले लेखन यासाठी महत्वाचे ठरते. यामध्ये गौरी देशपांडे, मेघना पेठे, कविता महाजन, अश्विनी धोंगडे, प्रज्ञा पवार, उर्मिला पवार आणि काही लेखिका यांच्या साहित्यातून स्त्रीवाद आणि जागतिकीकरण यांचे चित्रण येते.

**जागतिकीकरण आणि स्त्री:**

जागतिकीकरणामुळे भारतासारख्या देशात बहुसंख्य, गरीब, निरक्षर, अकुशल आणि कमकुवत गटामध्ये असलेल्या स्त्रियांवर विपरीत परिणाम झाला आहे. जागतिकीकरणाची सर्व धोरणे पुरुष

प्रधान व्यवस्था व श्रेणी रचना कायम करण्यासाठी मदत करत असल्याने ती स्त्रियांच्या विरोधात आहेत. स्त्रियांही त्यातीलच एक आहेत. त्यांना अन्न, पाणी, निवारा, रोजगार, वस्त्र, शिक्षण, आरोग्य अशा सर्व जीवनावश्यक वस्तूंसाठी झगडावे लागत आहे. जागतिकीकरणमुळे झपाट्याने खाजगीकरण होवू लागले त्या खाजगीकरणाचा फटका कामगार वर्गाला बसला. नवीन निर्यात क्षेत्रे निर्माण झाली, त्यामध्ये कामगार, कायदे, मानवी हक्कांची पायमल्ली झाली. सरकारने गरीबांचा विकास करण्याऐवजी, भांडवलदार व खाजगी उद्योगांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे रोजगाराची असुरक्षितता, अतिप्रगत तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणाच्या संधी कमी झाल्या, शेतीक्षेत्रावर दडपण वाढले, अनेक छोटे उद्योग, मोठे स्थानिक उद्योग, बंद पडले. वाढती बेकारी, वाढता देह विक्रय व्यवसाय, स्त्रियांवरील वाढती हिंसा, सेक्स टुरिझम, शेतकरी, कामगाराच्या आत्महत्या याचा परिणाम स्त्री जीवनावर झाला. यांचे चित्रण मराठी कवी, कथाकार, मराठी साहित्यिक आपल्या साहित्यातून करु लागले. यानंतर कोरोना काळामध्ये स्त्रियांवर आर्थिक जबाबदारी अधिक मोठ्या प्रमाणात निर्माण झाली, कोरोनामुळे अनेक स्त्रिया विधवा झाल्या त्यांचा परिणाम कुटुंबावर निर्माण झाला. त्यांची दखल कोणीही घ्यायला तयार नाही. यांचा परिणाम बेरोजगारी वर आरोग्यावर व शिक्षण यावर दिसून येतो.

यावर भर जागतिकीकरणामुळे व खाजगीकरणामुळे ऐच्छिक निवृत्ती योजना कामगार, कपात, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात स्त्रियांची होणारी पिछेहाट, यांत्रिकीकरणामुळे पारंपारिक स्त्री व्यवसाय बुडाले, रेशमाची आयात वाढल्याने स्थानिक रेशीम उद्योगाला घरघर लागली.

मासेमारी, सहकारी व कुटीरउद्योगावर घरगुती उद्योगावर संक्रात आली. या सर्वाला मोठ्या प्रमाणात स्त्रिया बळी पडत आहेत अर्थव्यवस्थेची पुर्नरचना या धोरणाचा परिणाम म्हणून शिक्षण व आरोग्य श्रेयांचे खाजगीकरण, व्यापारीकरण, घडून आले. शासनाची कल्याणकारी राज्याची संकल्पना खाजगी शक्तीच्या प्रभावाखाली अदृश्य होत आहे. त्यांचा परिणाम स्त्रियांच्या शिक्षण, रोजगार, व आरोग्यावर होत आहे.

**जागतिकरण, कोरोनाकाळ आणि स्त्री :—**

जागतिकीकरणामुळे स्त्री हतबल झाली असतांनाच कोरोना काळातील लॉकडाऊनमुळे तिच्यावर अनेक प्रकारचे हिसांचार झालेले आहे. स्त्रीवर पतीचा अधिकार असतो. आणि त्याला तो अधिकार गाजविण्याचा अधिकारी आहे अशा प्रकारची सामाजिक मानसिकता आजही दिसून येते.

कोरोनाकाळातील स्त्रीयांसमोरल प्रश्न, आव्हाने हा संपूर्ण वेगळा विषय आहे. त्यामुळे इथे त्याचा उहापोह थोडक्यात करत आहे.

जागतिकरणाचा स्त्रियांचा दृष्टीनेही अभ्यास व्हायला हवा बोटावर मोजण्याइतक्या स्त्रिया सर्व स्त्रियांचे प्रतिनिधित्व करत आहे.

**निष्कर्ष :—**

* जागतिकीकरणाच्या या २१ व्या शतकात मोजक्या स्त्रिया त्यांच्यापासून कितीतरी वर्ष दूर ठेवलेल्या क्षेत्रात प्रवेश करुन कार्यरत आहेत.
* मूळात स्त्रीचा बुध्दी व प्रतिभेशी जणू काही संबंध नसतो. ही हीन भावना निर्माण झाल्यामुळे पुरुष प्रधान संस्कृती स्त्रीचे अस्तित्व टाळत आलेली आहे. आणि आजही टाळते .

* आजही पुरुषप्रधान संस्कृती स्त्रीकडे आणि स्त्री सामर्थ्याकडे संशयाने पाहते.
* स्त्रीयांने कमी लेखाल्यामुळे स्त्री दबावाखाली जगण्यापेक्षा स्वत:च्या पायावर, उभी राहण्याचे धाडस निर्माण करते आहे. त्यामुळे शिक्षणाचे, व्यवसायाचे, कौशल्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे.
* स्त्रीयांच्या जन्माचे प्रमाण घटते आहे. त्यामूळे सामाजिक अभिसरणाला सामोरे जावे लागेल.
* स्त्रीयांचे प्रमाण कमी झाल्यास वेगवेगळ्या रूढी, परंपरा, चालीरिती बदलु शकतात.
* पुर्वीपेक्षा स्त्रीया काही प्रमाणात आत्मनिर्भर होऊन आर्थिक स्वावलंबन उपभोगत आहेत.
* काही समाजामध्ये अल्पप्रमाणत निवडीचे स्वातंत्र्य स्त्रीयांना मिळत आहे.
* ग्रामीण भागातील स्त्रीयांची अजुनही दयनिय अवस्था आहे, तेथेही मोजक्याच स्त्रीयांचा विकास होते. शिक्षणापासून दूर असलेल्या स्त्रियांकडे अजुनही निर्णयक्षमता आली नाही.
* शिक्षण असले तरी तिला स्वत:चा निर्णय घेता येत नाही. आज स्त्रीयांना सरपंच पद प्राप्त होत असेल तर तिचा नवरा दूसरा सरपंच म्हणून काम करतो. त्यामुळे तिची अतिशय घुसपट होतांना दिसते याचे चित्र—मराठी साहित्यात उमटले आहे.

## संदर्भ सूची :-


१) सिमॉन द ब्रोव्हा— द सेकण्ड सेक्स

२) जॉन स्टुअर्ट — मिलाएर्हेरिएट टेलर

३) सफ्रेजेट चळवळ — मताधिकार

४) मेरी वूलस्टोनक्राप्ट

५) रेडस्टॉकिंग्ज, न्युयॉर्क (रेडिकल फेमिनिस्टस)

६) दै. लोकमत — दि. १५ जुलै पान क्र. २

७) परिवर्तनाचा वाटारु जुलै २०२० अंक ०६

८) दासगुप्ता लोपा व इतर (२००४) महिलांचे कुंटुंबातील स्थान, महिला सबलीकरण, दारिद्रय निमुर्लन व स्वयंमहाय्य बचत गट, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक.

९) जागतिकीकरण आणि मराठी साहित्य — डॉ. शरद गायकवाड डॉ. प्रा. सुनिल शिंदे स्नेहवर्धन प्रकाशन, पुणेप्र. आ. आक्टोंबर २००९

१०) शोध मराठीपणाचा — संपा. डॉ. अरुणा ढेरे—ग्रंथाली प्रकाशण, मुंबई फेब्रु २००९

११) विकास व पर्यावरणीय अर्थशास्त्र — प्रा. डी. एस. निकम, निराली प्रकाशन

१२) साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण —डॉ. भालचंद्र नेमाडे, लोकवाङ्मय प्रकाशन गृह चौ. आ. २००५ मुंबई

१३) जागतिकीकरण आणि देशीवाद — रंगनाथ पठारे लोकवाङ्मय प्रकाशन गृह पुनमुद्रण मुंबई — २००३

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/